Impact Factor
5.307 (SJIF)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173

# छत्रपती शिवाजी राजे व माहुरची 'रायबागन'

**डॉ. मंगला गोरे**
इतिहास विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय नंदनवन नागपूर

---

मध्ययुगीन काळात स्त्रियांची स्थिती फारशी चांगली नव्हती. स्त्रियांवर विविध अन्याय अत्याचार होत होते. एखाद्या राजाने शत्रूचे राज्य जिंकून घेतले तर पराभूत राजाच्या राज्यातील स्त्रियांवर विजयी सैनिक किंवा राजा विजयाच्या उन्मादात अनेक अत्याचार करून त्यांना गुलाम बनवत असे. अशा अत्याचाराला बळी पडण्यापेक्षा राजपूत स्त्रिया जोहार करून घेत असत. मध्ययुगात भारताच्या इतिहासात दासी म्हणून स्त्रियांची खरेदी विक्रीही होत असे हा स्त्रियांचा व्यापार शिवाजीराजांनी शिवकाळात पूर्णपणे बंद करून स्त्रियांना सन्मान दिला. शिवाजीराजांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू मासाहेब जिजाऊनीच पाजले होते. परस्त्री मातेसमान मानणारा स्वराज्यातीलच नव्हे तर शत्रूच्या स्त्रियांचाही सन्मान करणारा युगपुरुष आजही प्रत्येकाच्या हृदयात वास करतो कारण शिवाजी राजे रयतेचे राजे होते.

**सावित्री देशमुख :**

सावित्रीच्या मातुकुळाचा उल्लेख आढळून येत नाही परंतु तिला देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण घराण्याचा वारसा होता. दक्षिण वऱ्हाडात पैनगंगा आणि पूस नदीच्या संगमावर महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपिठांपैकी माहूर हे एक शक्तिपिठ आहे. माहूर हे नांदेड जिल्ह्यातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. त्याचबरोबर रामगड उर्फ माहूरचा किल्ला, माहूर संग्रहालय, सोनपीर दर्गा, पांडवलेणी आणि राजे उद्धवराव उर्फ उदाराम देशमुख यांचा वाडा अशा अनेक ऐतिहासिक वास्तुसुद्धा माहूरमध्ये आहेत. जातीने ब्राह्मण असलेले 'वाशीम'चे राजे उदाराम देशमुख हे 'माहुर'चे जहागीरदार होते. माहूर येथील राजे देशमुख घराण्याचे संस्थापक उदाजीराम हे सुरुवातीच्या काळात वाशिम जवळच्या सावरगावचे कुळकर्णी होते. याच घराण्यातील सावित्री देशमुख होय. अहमदनगरची निजामशाही आणि मुगल यांच्यात वऱ्हाडासाठी संघर्ष सुरु होता. त्यामुळे कधी मुगल तर कधी निजाम यांच्या अंमल इथे राहत असे.

शहाजहानने मुगल बादशहा जहांगीरदार विरुद्ध केलेल्या बंडाचा बिमोड लखुजी जाधव आणि उदाराम यांनी केला होता. इ.स. १६२४ मध्ये झालेल्या भातवडीच्या युद्धात आदिलशहाला मोगलांनी मदत केल्यामुळे मलिक अंबर विरुद्ध उदाराम आदिलशहाकडून लढले होते. स्वतःच्या कर्तबगारिने उदाराम या वतनदारांनी देशमुख हे वतन मिळविले व मोगलांकडून मनसबदारीही मिळविली होती. मोगल बादशहाने त्याचा राजा ही पदवी देऊन बहुमान केला, त्यामुळेच त्याचे वंशज राजे म्हणून ओळखले जाऊ लागले. राजे उदाराम मोगलांच्या सेवेतच इ.स.१६३२ मध्ये दौलताबादच्या किल्ल्याजवळ मरण पावले. त्यानंतर माहूरची वतनदारी त्याचा मुलगा जगजीवनराम यांच्याकडे आली. तसे मुघल फर्मान शिवकालीन पत्र सारसंग्रहामध्ये प्रकाशित झाले आहे. माहूरच्या याच घराण्यातील सावित्री देशमुख कर्तबगार स्त्री होती.

सावित्रीबाई ही उदाराम देशमुख यांची पत्नी होती असा उल्लेख आहे.परंतु ती जगजीवनरावाची पत्नी व बाबूराव राजे यांची आई होती असे दिसते. सावित्रीबाईने छ. शिवाजी राजांना आपला धर्मपिता मानले, शिवाजीचे वय त्यावेळी (उमरखिंडीची लढाई) ३१ वर्ष आणि सावित्रीबाईचे वय त्यापेक्षा कमी असावे. नाहीतर तिने

शिवाजीला धर्मपुत्र किंवा धर्मबंधू असे म्हटले असते.एकंदरीत सावित्रीबाईही जगजीवनरावाची पत्नी व राजे बाबूराव यांची आई होती असे म्हणणेच संयुक्तीक होईल, उदाराम घराण्याविषयी पहिल्यांदा लिहणारे यादव माधव काळे यांनी त्रैमासीक वर्ष २ जोड अंक १ ते ४ परा पान क्र. ४५, ४६ यातील चूक सुधारून भारत इतिहास संशोधन प्रकाशनाच्या पुस्तकात एका ठीकाणी रायबागण ही उदारामाची बायको नसून जगजीवनरावाची बायको व बाबुरावांची आई होती ही दुरुस्ती केलेली आहे. या सर्व मताचा विचार केल्यास व उमरखिंडीची लढाई नजरेसमोर ठेवल्यास सावित्रीबाईही जगजीवनरावाची पत्नी व बाबूराव यांची आई होती असे दिसून येते.

राजे जगजीवनराव हा इ. स. १६५८ मध्ये औरंगजेबाच्या सैन्यात होता. औरंगजेब आणि त्याचा मोठा भाऊ दाराशुकोह यांच्यात सामुगड येथे वारसासाठी युद्ध झाले. या वारसा या युद्धात औरंगजेबाचा विजय झाला असला तरी या युद्धात जगजीवनराव मरण पावला. राजे जगजीवनरावाची माहुरची वतनदारी राजे बाबूराव यांचेकडे आली. राजे बाबुराव हे अल्पवयीन असल्याने त्याची पालनकर्ती म्हणून सावित्रीबाईने माहूरचा कारभार हाती घेतला जगजीवनराम अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन वऱ्हाडातील मोगल राज्यात हरचंद्रराय नावाच्या मोगली सरदाराने बंड केले. कारण उदाराम देशमुख दक्षिणचा मनसबदार होण्याआधी हरचंद्रराय हा वाशिम व माहूर या मोगलांच्या दोन जिल्ह्याचा अधिकारी होता. हरचंद्रराय याने मोगलांचा प्रदेश उध्वस्त केला होता. म्हणून हरचंद्रराय या सरदाराला काढून त्याच्या ठिकाणी उदाराम देशमुखची नियुक्ती झाली होती. उदाराम देशमुखचा नातू बाबुराव याच्या काळात मात्र हरचंद्रराय या मोगली सरदाराने उदारामचा बदला घेण्यास सुरुवात केली. तेव्हा सावित्रीबाईने स्वतः पदर बांधला माहुरच्या डोंगरावरुन फौज घेऊन चालून गेली.

सावित्रीने स्त्रित्वाची खूण म्हणून निशाण्याच्या काठीला चोळी बांधून ती काठी सैन्यात फिरविली. 'शर्थीने लढा, दुश्मन मारुन काढा, जिंका, तुमच्या बहिनीच्या चोळीची लाज राखा' असा जाहिरनामा काढून सैन्यास आव्हान केले. सैनिकही तिच्या आव्हानाला प्रतिसाद देत शर्थीने लढले व हरचंद्रराय या मोगल सरदाराचा बिमोड केला. सैन्याचे नेतृत्व एका स्त्रीने केले असा उल्लेख आहे.

**सावित्री देशमुख हिला औरंगजेबाने दिलेला 'रायाबगण' हा किताब** :

सावित्रीने म्हणजेच एका स्त्रीने हरचंद्रराय या मोगल सरदाराचा पराभव केला परिणामी तिच्या पराक्रमाची, शौर्याची बातमी साम्राज्यात पसरली. औरंगजेबाने तिच्या पराक्रमावर खूश होऊनच तिला दरबारात बोलावून 'पंडिता' रायबागण' हा किताब बहाल केला. रायबागन या शब्दाचा अर्थ स्वीशार्दुल असा होतो. तसेच रायबगन म्हणजे राजव्याघ्री (राज्याची वाघीण) होय.कविन्द्र परमानंदकृत श्री शिवभारत या ग्रंथात तिचा या नावाचा उल्लेख आहे. तिने केलेल्या धड्सावरून तिच्या पराक्रमावरून ती खरोखरच माहुरची वाघीणच होती असे दिसते. पतीच्या मृत्यूने खचून जाऊन सावित्री कपाळावर हात ठेवून रडत बसली नाही. मोठ्या धाडसाने आपला मुलगा बाबूराव याला घेऊन औरंगजेबाच्या चाकरीत दाखल झाली. शाहिस्तेखान याच्या मोहिमेतही सहभागी झाली होती शाहिस्तेखानाच्या मोगली फौजेत एक अस्सल महाराष्ट्रीय ब्राम्हण स्त्री होती. अशी नोंद आहे.

**शिवाजीराजे यांच्या विरोधात रायबागणची रवानगी :**

सन १६६१ मध्ये शिवरायांच्या आक्रमक कारवायांना रोखण्यासाठी औरंगजेबाने शाहिस्तेखानास दक्षिणेत पाठवले. शाहिस्तेखानाच्या मदतीला कारतलबखानाला व इतर सरदारांसोबत रायबागण हिलाही पाठविले होते. रायबागण हिने शिवाजी विरुद्ध मोगलांच्या बाजूने शस्त्र उपसले. तेव्हा तिच्याशी लढतांना शिवाजीची खास आज्ञा होती. स्त्री शस्त्रविरहित न मारावी. शस्त्र धारण केले असता निंद्य नाही. छत्रपती शिवाजी महाराज व मुघल सादर

कारतलबखान ह्यांच्यात दि. २ फेब्रुवारी १६६१ रोजी उंबरखिंडची लढाई झाली. उत्तर कोकण काबिज करण्यासाठी निघालेल्या मुघल सैन्याला, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने उंबरखिंडच्या दरीत गनिमी कावा पद्धतीने हल्ला करून, मुघल सैन्याचा पूर्ण पराभव केला. यावेळी उत्तरेकडून मुघल आणि दख्खनमध्ये आदिलशाही असे महाराजांचे दोन प्रमुख शत्रू सामोरी उभे होते. उपलब्ध सैन्यबळ, साधनसामग्री आणि समोर उभी असलेली संकटे पाहून शिवाजी राजांनी सावध पवित्रा घेत रुस्तुमेजमानच्या मार्फत मध्यस्थी करून आदिलशहाशी मैत्रीचा तह केला. या प्रसंगी शिवाजीराजांचे प्रमुख ध्येय मुघली आक्रमणाचा धैर्याने सामना करणे हेच होते.

**रायाबागान हिचा पराभव व शिवाजी राजे यांच्याकडून सन्मान :**

राजांचे हेरखाते खानाच्या चहूबाजूंस पसरले होते. कारतलबखानाच्या प्रत्येक हालचालीची बातमी राजगडावर शिवरायांना मिळत होती त्यानुसार शिवाजी राजांनी आपल्या सैन्याची रचना केलेली होती. घाट उतरून मुघल सैन्य उमबरखीन्डीत आले असतांना घनदाट अरण्यात लपून बसलेल्या मराठा सैन्याने मुघालांवर हल्ला सुरु केला. मुघल सैन्य घाबरून वाट मिळेल त्या दिशेने पळत होते. पण सर्व मार्ग छ शिवाजीने अडवून धरले होते. कारतलबखान, रायबागन व मोगलांच्या सैन्याने प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला.

छ. शिवाजी महाराजांस तिच्या पराकमाची माहिती असल्यामुळे आपल्या पराक्रमी सरदारांना पाठवून उंबराखिंडीत तिला अडविण्याचा हुकूम केला व स्वत पाठीमागून आले. उंबरखिंडीत झालेल्या लढाईत शिवाजी महाराजांनी तिचा दारूण पराभव केला. तिचा मुलगा बाबूराव हा शिवाजी महाराजांच्या हाती सापडल्यामुळे ती शरण आली. छ. शिवाजीराजांनी तिच्या पराकमाचे व लढण्याच्या पद्धतीचे कौतुक करून त्यांच्या नेहमीच्या उदार राजनीतीनैपुण्याने रायबागणला साडीचोळी व आभूषणे देवून तिचा सन्मान केला तसेच बाबूराव यांना सुध्दा वस्त्र देवून सन्मानाने परत पाठविले होते. तिनेही स्वतःला शिवाजीची धर्मकन्या म्हणवून घेतले. आता लढण्यात काहीही अर्थ नाही, हे जाणून रायबागनने कारतलबखानास शिवाजी महाराजांना शरण जाण्याचा सल्ला दिला. असाही उल्लेख आढळून येतो त्यावेळी, 'तुम्ही सर्व सैन्य बाघाच्या तोंडी देऊन मोठी चूक केली आहे. आता मरणाच्या दारात उभ्या असलेल्या सैनिकांना वाचवायचे असेल तर छत्रपती शिवाजी राजांना शरण जा व त्यांच्याकडे दयायाचना करा. राजे मोगलांप्रमाणे नाही, शरण आलेल्या सर्वांना माफी देतात' असे खडे बोल रायबागन हिने कारतलब खानाला सुनावले. तिचा सल्ला ऐकून कारतलबखानाने छत्रपती शिवाजी महाराजांकडे दूत पाठविला, मोठी खंडणी दिली व क्षमा मागितली आणि आपली सुटका करून घेतली.

रायबागणचे एक पराक्रमी स्त्री म्हणून शिवाजीलाही कौतुक वाटले असे बखरकार म्हणतो. ही बाई अत्यंत कर्तबगार, धर्मिक वृत्तीची मुत्सद्दी व अभिमानी होती, नवरा मेल्यावर इतर स्त्रियांप्रमाणे दुःख करीत घरात बसून न राहता पदर बांधून आणि तलवार घेवून मोगलांच्या फौजेत हजर होती. मोगलांकडील एका फौजेच्या तुकडीच्या प्रमुखपदी रायबागण हिची नेमणूक केली होती.

रायबागण युद्धकला निपूण, निर्भय व स्वामीभक्त स्त्री होती. काळाच्या कसोटीवर तिचे शौर्य व पराक्रम तिचे छ.शिवाजीने केलेले कौतुक व सन्मान म्हणजेच शिवाजी राजांच्या मनात दयाबुद्धी, आदर, उदार अंतकरण, स्त्री सन्मान या सर्व गोष्टी जिजाऊंनी ठासून भरल्या होत्या. हे 'रायबागन' माहूरची वाघीण सावित्री देशमुख तिच्याशी शिवाजीने केलेला व्यवहार तसेच कल्याणच्या सुभेदाराची सून हिचा केलेला सन्मान यावरून स्पष्ट होते. राज्यातील स्त्रियांनाच नव्हे तर शत्रूच्या स्त्रियांना देखील सन्मानाची वागणूक देणारा विश्वातला पहिला आदर्श राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय. आज स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार पाहता शिवरायांच्या स्वराज्याची नितांत

गरज या देशाला आहे असेच म्हणता येईल.

**संदभ्र ग्रंथ सूची :**

- गुजर; मा.वी.(संपा.), करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, भाग २, पुणे, १९६२ लेखांक ३८,
- भावे नीलिमा - शिवकालीन स्त्रियांच्या अधिकार कक्षा, पापुलर प्रकाशन.
- देशपांडे प्र. न. (संपा.) अखिल महाराष्ट्र परिषद, १९९५, पृ. ९६, ९७.
- काळे या.मा. राजे उदायाराम घराणे, भा.इ.सं.मं.वर्ष २, अंक १ ते ४
- बेंद्रे वा.सी. उमबाराखीन्डीची लढाई, त्रैमासिक भा.इ.सं.मं.
- देशमुख; विजय, शककर्ते शिवराय, खंड १, छत्रपती सेवा प्रतिष्ठान, नागपूर, तृतीय आवृत्ती, २०१०, पृ. ३६०.
- पुरंदरे; बाबासाहेब, राजा शिवछत्रपती, २००९, पृ. ३५८.
- शिवकाव्य खंड भाग १, पृ. ९८; 'रायबागण' म्हणजे स्त्रीशार्दूल, राजव्याघ्री हे शब्द शिवकाव्यात आहे.
- साने; का. ना. (संपा.) सप्त प्रकरणात्मक शिवाजी बखर, चौथी आवृत्ती, पुणे.

Research Hub International Journal